# प्रकरण पहिले

# मराठी कथेची पार्श्वभूमी

पृष्ठ - १ ते १५

# प्रकरण पहिले
# मराठी कथेची पार्श्वभूमी

**प्रस्तावना :-**

कथा हा मराठीतील एक महत्त्वाचा वाङ्मय प्रकार असून या वाङ्मय प्रकारच्या उद्‌गम, विकास, विस्तार व स्वरूप वैशिष्टयांवर दृष्टीक्षेप टाकला असता असे लक्षात येते की, हा एक प्राचीन वाङ्मय प्रकार आहे. पहिली मराठी कथा ही लीळारित्रामध्ये सापडली ती म्हणजे आपण अनामिक परंपरेने ऐकत आलेली चिऊकाऊची कथा होय. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांच्या जीवनातील प्रसंग म्हणजे चुटकेवजा गोष्टच होय. म्हणजेच लोककथा ही मराठी भाषेची पायाभरणी म्हणावी लागेल. मराठी कथा ही ग्रंथनिर्विष्ट होण्यापूर्वी मौखिक स्वरूपात लोककथांच्या रूपाने अस्तित्वात होती असे दिसते. या दृष्टीने लोककथा ही मराठी भाषेची गंगोत्री म्हणता येईल.[१] कथा हा सर्वात जुना व सर्वात नवा वाङ्मय प्रकार आहे. लहानपणापासून कथा आपल्यावर संस्कार करीत असते. बालपणी आईने सांगितलेल्या चिऊकाऊच्या, देवदेवतांच्या गोष्टी इ. मुळे कथेचे कल्पनाविश्व संपन्न होते. कुमार अवस्थेत शूरवीरांच्या साहसकथा, रहस्यकथा आवडू लागतात. तरूण अवस्थेत प्रेमकथांचे आकर्षण वाटू लागते. प्रौढपणी वास्तवकथांशी मैत्री होते. वृध्दावस्थेत अध्यात्मातील कथा आवडू लागतात. थोडक्यात सांगायचे झाले तर पाळण्यापासून थडग्यापर्यंत कथा. आपल्याला सोबत करत असते.

प्रत्येकाचे जीवन हीच एक कथा आहे. कारण माणूस जगत असताना त्याला वेगवेगळे अनुभव येत असतात आणि तो ते अनुभव दंतकथेच्या किंवा लिखित स्वरूपात इतरांना सांगत असतो. मुद्रणपूर्वकाली वाङ्मयाच्या प्रसाराची साधने श्रवण व कथन हीच होती. त्यामुळेच कथेने आपली अस्मिता आजवर जतन करून ठेवली आहे असे दिसते. म्हणजेच ज्याला आपण कथा म्हणतो त्याला पूर्वी 'गोष्ट' असे म्हटले जात

असे. पुढे गोष्टीची 'कथा' झाली, कथेची नवकथा झाली, नवकथेची 'लघुकथा' झाली. अशा पध्दतीने कथालेखन प्रकारात बदल होत असल्याचे दिसते. मानवी जीवनाच्या विकासाबरोबर विकास पावलेला कथा हा मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा वाङ्मय प्रकार आहे. मराठी कथेने मराठी माणसाचे मनोरंजन करण्याचे फार मोठे कार्य केले. प्राचीन काळातील जातक कथा, बृहत्कथा, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तीशी हे काही कथासंग्रह होय. अशा या कथालेखन प्रकारात काळानुरूप बदल होत आहे.

कथन वा निवेदन हे कथेचे एक प्रमुख वैशिष्टय आहे. कथेत 'घडून गेलेल्या' घटनांची गुंफण केलेली असते. आदि, मध्य व अंत असे कथेतील निवेदनाचे तीन टप्पे मानले जातात. अर्वाचीन कालखंडातील कथा मुद्रणकलेच्या शोधामुळे बहरू लागली. करमणूक (१८९० ते १९१०), मनोरंजन (१९१० ते १९२६), यशवंत व किर्लोस्कर (१९२६ ते १९४४), सत्यकथा अभिरूची (१९४५ ते १९६०) या मासिकांनी कथेच्या बहरण्यास हातभार लावला. करमणूकपूर्व कालखंडातील कथा ही दुबळी व परप्रकाशित होती. तिला स्वत:ची शैली नव्हती. स्वत:चे विश्व नव्हते.

मराठी कथेला खऱ्या अर्थाने मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले ते 'हरिभाऊ आपटे' यांनीच होय. म्हणून मराठी कथा वाङ्मयाच्या विकासातील हरिभाऊ आपटे यांची कथा मैलाचा दगड ठरते. मराठी माणसाच्या जीवनातील बदल त्यांनी आपल्या कथांतून मांडला. हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला', 'अपकाराची फेड उपकारानीच', 'थोड्या चुकीचा घोर परिणाम', 'पण लक्षात कोण घेतो', 'पक्की अद्दल घडली', 'गोदावरीने काय केले?' इ. स्फुट गोष्टी करमणूकमधून वाचायला मिळू लागल्या. तसेच 'कुटुंबमालेतून' सहकारी कृष्ण यांनी जीवनातील विविध समस्यांचे चित्रण केले.

मनोरंजन कालखंडात (१९१० ते १९२६) वि.सी. गुर्जर यांनी लघुकथेला लोकप्रिय करण्याचे काम केले. त्यांनी सुमारे ७०० कथा लिहिल्या. त्यामुळे हा कालखंड गुर्जर कालखंड म्हणूनही ओळखला जातो. गुर्जराच्या कालखंडातच कृ.के. गोखले,

ना.ह. आपटे, न.चि. केळकर, वा.म. जोशी हे कथालेखन करताना दिसून येतात. दिवाकर कृष्णांनी (१९२६ ते १९४४) लघुकथेला नवीन वळण देण्याचे व लघुकथेला नावारूपाला आणण्याचे कार्य केले. दिवाकर कृष्णांच्या कालखंडात 'यशवंत' व 'किर्लोस्कर' या दोन मासिकांनी लघुकथेच्या विकासाला हातभार लावला. प्रा. ना.सी. फडके आणि वि.स. खांडेकर हे या कालखंडातील प्रमुख लेखक होय. 'कलेसाठी कला' व 'जीवनासाठी कला' असा वाद या दोन लेखकांच्यामध्ये असल्याचे दिसून येते. तसेच ना.सी.फडके यांनी कथेच्या तंत्राची चौकट सांगितली. आकर्षक सुरूवात, गुंतागुंत, निरगाठ, उकल व परिणामकारक शेवट असा क्रम ठेवला. कथेमध्ये रेखीवपणा, सफाईपणा व डौलदारपणा आणला. तसेच य.ग. जोशी, द.र. कवठेकर, अनंत काणेकर, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, मामा वरेरकर, वि.द. घाटे, प्र.के. अत्रे, जयवंतराव सरदेसाई, विभावरी शिरूरकर, वामन चोरघडे या लेखकांनी लघुकथेला हातभार लावला. तसेच १९४५ ते १९६० या कालखंडात 'सत्यकथा' व 'अभिरूची' या मासिकांनी कथा प्रसिध्द केल्या. नवकथाकारांनी कथेला साजशृंगार चढवून दिला.तसेच मनन, चिंतन, अनुभव यावर नवकथाकारांनी भर दिला. नवकथा एका बाजूने अंतर्मुख बनली. १९४५ नंतर अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, दि.बा. मोकाशी, डॉ. इरावती कर्वे, विद्याधर पुंडलिक, जी.ए. कुलकर्णी, चि.त्र्यं. खानोलकर हे नवकथाकार कथालेखन करताना दिसून येतात. या सर्व मान्यवरांनी कथेला नव्या वळणावर आणून सोडले आणि या नव्या वळणाच्या वाटेवरून ग्रामीण व प्रादेशिक अशा पाऊलवाटा निघू लागल्याचे दिसते.

**नवकथा - (१९६० नंतर पुढे)**

मराठी कथेत विविध बदल होत आल्याचे दिसते. कथा ही अनेक दिशांनी प्रवास करीत असल्याचे दिसते. १९६० नंतर नवकथेत अनेक परिवर्तने घडली. ग्रामीण कथा, प्रादेशिक कथा, दलित कथा, स्त्रीवादी कथा, विज्ञान कथा, अस्तित्ववादी कथा असे प्रकार नवकथेच्या क्षेत्रात दिसू लागले. 'नवकथा म्हणजे काही जुन्या कथेच्या शेजारी

काढलेले एक छोटेसे वर्तुळ नव्हे. नवकथा हे एक मोठे वर्तुळ आहे. जुन्या कथेचे वर्तुळ हा या मोठ्या वर्तुळाचा लहानसा भाग आहे' असे नवकथेला प्रस्थापित करताना गंगाधर गाडगीळांनी म्हटले होते. (खडक आणि पाणी). १९६० नंतरच्या कथेचा विकास पाहिला तर नवकथेच्या वर्तुळाच्या पोटातच ६० नंतरची कथा व आजची कथा यांच्या विकासाची बीजे आहेत हे लक्षात येते.[२] म्हणजेच नवकथा ही आगळ्या वेगळ्या वाटेने चालू लागली आणि ती वाट आजदेखील चालू असल्याचे दिसते.

**ग्रामीण व प्रादेशिक कथा :-**

स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण साहित्याची प्रेरणा म. जोतिबा फुले हे होते तर १९२० साली लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि म. गांधीजींनी स्वातंत्र्याच्या लढ्याला नवी दिशा दिली. 'खेड्याकडे चला' असा मूलमंत्र त्यांनी सामान्य जनतेला दिला आणि सर्व राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचे लक्ष खेड्याकडे गेले. त्याचा परिणाम साहित्यावरही झाला. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण साहित्यिक आपल्या साहित्यातून रेखाटू लागले. गांधीवादाच्या प्रेरणेने निर्माण झालेली ग्रामीण कथा पुढे रंजनवादी बनत गेली. ग्रामीण साहित्यिकांनी आपापल्या परीने ग्रामीण समाजाचे दर्शन आपल्या साहित्यातून घडविल्याचे दिसते. खेडे म्हटले म्हणजे आपल्या नजरेसमोर गुरे-ढोरे, शेती, शेतीतील अवजारे, पिके, फुले, पाने, कुळव, नांगर इ. चित्र येते आणि हेच खेड्याचे चित्रण व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कथासाहित्यात वास्तवाच्या पातळीवर आणले. 'माणदेशी माणसाचे' दर्शन घडविणारी त्यांची कथा, कथेतील दु:खी, कष्टी, भोळी भाबडी, कणखर वृत्तीची माणसे त्यांनी आपल्या कथेतून रेखाटली. तसेच श्री. म. माटे यांनी ग्रामीण कथा वाङ्मयाला सामाजिक वास्तवाचे भान दिले. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी कार्य केले. माटे हे समाजसुधारक होते. त्यांनी दलित समाजाच्या जीवनावर कथालेखन केले. तसेच जी.ए. कुलकर्णी हे नवकथेतील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या कथेमध्ये नियतीचे चित्रण येते. कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या सीमाभागातील खालच्या वर्गातील माणसांचे तुटपुंजे, लाचारीचे

जीवन चित्रण करून नियती त्यांच्याशी कशी क्रूर खेळ खेळते याचे चित्रण त्यांच्या कथांमधून येते. 'जी.एं.ची कथासाधना विस्तारपूर्ण आणि परिश्रमाने केलेली असते. एखादया प्राचीन भव्य मंदिराप्रमाणे त्यांच्या कथांची रचना असते. तिचा परिणाम विस्मयकारक होतो. त्यातून गूढ अस्तित्वतत्वाचा प्रवाह थरथरत वाहतो आणि तो आपला पिच्छा पुरवीत राहतो. त्यांच्या विनोदातही विचित्र प्रतिमा आणि अस्वस्थ करणारा विखार असतो. मानवी दु:खाच्या शीलाखंडातून सघन कथा आकार घडवणारे जी.ए. हे मुलखावेगळे मराठी कथाकार आहेत.[३] चि.त्र्यं. खानोलकर हे कोकणचे तिथल्या परिसराचे आणि तेथील लोकांचे जीवनदर्शन आणि प्रतिमासृष्टी, प्रतीके यांचे लोकविलक्षण चित्रण करतात. तर राजेंद्र बनहट्टी हे स्वतंत्र वृत्तीचे कथाकार असून त्यांच्या कथा माणसांच्या व्यावसायिक, व्यवहारी जीवनावरच्या आहेत. प्रेम हा विषय त्यांनी जवळपास वर्ज्य मानला आहे. हे त्यांचे महत्त्वाचे वैशिष्टय मानायला हरकत नाही. त्या व्यवसायासंबंधी आहेत. याचा अर्थ त्या व्यवसायाची आणि व्यावसायिकांची माहिती देतात असे नव्हे. व्यवसायाच्या निमित्ताने माणसामाणसामधले संबंध विशिष्ट आकार घेतात. त्यांच्या स्वार्स्थाला विशिष्ट रूप येते. त्यांच्या आशा-आकांक्षा विशिष्ट दिशेने उत्तेजित होतात. आणि अखेरीस यावर निर्णायक परिणाम करणाऱ्या योगायोगाच्या घटना त्यांच्या सरळ रेषेत चाललेल्या आयुष्याला उलटेपालटे करून सोडतात. या प्रकारचे चित्रण करण्यात मराठी कथेने कधी फार रस घेतला नव्हता.[४]

तसेच ग.ल. ठोकळ यांनी आपल्या कथेतून गावे, शेतमळे, नदया, मंदिर-निसर्ग यांचे वर्णन केले आहे. लक्ष्मणराव सरदेसाई व वि.स. सुखटणकर यांच्या नंतर कथालेखन करणारे कथाकार ग.ल.ठोकळ हे होत. विदर्भातील ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारे उध्दव शेळके हे वास्तवाचे नेमके चित्रण करतात. ग्रामीण चालीरीती, रूढी-परंपरा, सणवार यांचे चित्रण त्यांच्या कथेत येते. तसेच शंकर पाटील हे ग्रामीण साहित्यातील एक विनोदी कथाकार आहेत. त्यांची कथा मानवी मनातील भावनांची

गुंतागुंत, त्यांची आंदोलने आपल्याला उकलून दाखवते. पोट धरून हसायला लावणारे विनोदी ग्रामीण कथाकार द.मा. मिरासदार यांची कथा घटना, व्यक्तिस्वभाव, प्रसंगावर आधारलेली असते. तसेच त्यांच्या कथेत शेती, शेतीतील पिके, नदी, ओढा, गाव, गावातील रिकामटेकडी माणसे, त्यांची वेशभूषा, चालणे-बोलणे इ. चे वर्णन येते. तर आनंद यादव यांच्या कथेत ग्रामीण संस्कृतीचे चित्रण येते. रा.रं. बोराडे यांनी ग्रामीण माणसाचे अज्ञान, दारिद्रय, दु:ख, स्त्रियांवर होणारे अत्याचार, बलात्कार, ग्रामीण स्त्री पुरूषांची कामवासना, बालमजुरांची व्यथा इ. चे मिस्किलशैलीने विनोदी चित्रण केले आहे.

रणजित देसाई यांनी सामाजिक, ऐतिहासिक कथा लिहिल्या. हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लिम संबंधावर कथा लिहिल्या. तर भास्कर चंदनशिवे यांनी ग्रामीण राजकारणी, भोळी-भाबडी, दलित, पीडित, अगतिक माणसे आपल्या कथासाहित्यातून उभी केली आहेत. त्यांच्या व्यथा, वेदना त्यांनी उलगडून दाखविल्या आहेत. चंद्रकुमार नलगे यांनी कोल्हापूर-सातारा परिसरातील ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. तसेच अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात हे दलित लेखक ग्रामीण कथाकार म्हणूनही ओळखले जातात. ह. मो. मराठे हे आजच्या नवीन पिढीचे प्रश्न आपल्या कथासाहित्यातून मांडतात. सखा कलाल यांच्या कथांचे स्वरूप प्रेमळ, हळव्या व करूणेकडे झुकणाऱ्या अनुभवांचे प्रकटीकरण आहे. तर चारूता सागर माणसांचा अतिशय तन्मयतेने शोध घेतात.

ग्रामीण साहित्यात काही ना काही वेगळेपण शोधून दाखवण्याचे काम कितीतरी कथालेखकांनी केले. यामध्ये कथालेखिकांनीही सहभाग घेतल्याचे दिसते. गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, आशा बगे, प्रतिमा इंगोले यांनी आपल्या साहित्यातून स्त्रियांचे चित्रण केले. मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, अ. ना. पेंडणेकर, अच्युत बर्वे, शं.ना. नवरे, ना.ग. गोरे, दिलीप चित्रे, विलास सारंग इ. कथालेखक ग्रामीण साहित्याचे चित्रण करताना दिसून येतात.

थोडक्यात 'साठोत्तरी दोन दशकात ग्रामीण समाजात परिवर्तन वेगाने घडू लागले. शेतीची नवी अवजारे, सहकाराचे जाळे, कृषी औद्योगिक धोरण या सुधारणामुळे खेड्यात बदल दिसू लागले. हे बदल टिपायला ग्रामीण भागातील तरूण लेखकवर्गही पुढे आला. कारण साठनंतर महाराष्ट्रात झालेला धो धो शिक्षणप्रसार. वाचक मिळाला, लेखकवर्ग तयार झाला असे सारांशरूपाने म्हणता येईल.[५]

**दलित कथा :-**

१९६५ नंतर दलित कथा अस्तित्वात आली. दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी तथागत गौतमबुध्द, म. जोतिराव फुले, कार्लमार्क्स आणि मुख्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत. दलित साहित्य वेदना, विद्रोह, नकार, पिळवणूक या वैशिष्टयांचा पुरस्कार करते. माणूस महान आहे हे सूत्र त्यांनी स्वीकारले. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवमुक्ती, न्याय यांचा दलित साहित्याने पुरस्कार केला. या साहित्याने वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारली. तसेच जे पाहिले, भोगले, अनुभवले तेच दलित लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडले. वास्तवता आणि सामाजिकता ही दलित कथेची प्रमुख वैशिष्ट्ये होत. दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते. तळागाळातील जो समाज वर्षानुवर्षे दळला गेला आहे, भरडला गेला आहे अशा समाजातील लोकांच्या व्यथा वेदना दलित कथाकारांनी आपल्या साहित्यातून शब्दबध्द केल्या.

दलित साहित्यातील आरंभी लेखन करणारे दलित कथाकार म्हणजे अण्णाभाऊ साठे हे होय. त्यांनी जे जगले, भोगले, पाहिले, अनुभवले तेच आपल्या साहित्यातून मांडले. अण्णाभाऊंनी 'चिरागनगरीची भुतं', 'खुळंवाडी' इ. कथासंग्रह लिहून जीवनाचे वास्तव दाहक आणि किती भीषण आहे हे दाखवून दिले. माणुसकीसाठी, भाकरीसाठी बेभान झालेल्या माणसांच्या कृती, अन्याय, जुलमाच्या रगाड्यात सापडलेली माणसे सहनशिलतेचे बंड झुगारून कसे बंड करतात बेभान होतात याचे दर्शन अण्णाभाऊंच्या कथेत घडते. तसेच बंधुमाधव या दलित कथाकाराने ताणतणावाचे सत्यासाठी

झुंजणाऱ्या मन:प्रवृत्तीचे चित्रण आपल्या कथेतून केले. बंधुमाधवाच्या कथेत सर्वप्रथम विद्रोह व नकाराच्या जाणीवा दिसू लागल्या. शंकरराव खरात यांनी आपल्या साहित्यात महार, मांग, रामोशी, परीट, न्हावी यांचे जीवन चित्रण केले आहे. खरातांच्या कथा व्यक्तिप्रधान आहेत. 'विशेषत: 'म्हार-मांग फार माजलेत' अशी भाषा गावचे पाटील, कुलकर्णी करू लागतात आणि त्यातूनच दलित वस्त्यांना बहिष्कार सोसावा लागतो किंवा छळाला तोंड दयावे लागते. खरातांनी मूकपणे सहन करणाऱ्या या वर्गाच्या वेदनेला बोलके केले आहे.[६]

बाबूराव बागुल हे दलित कथेत मानाचे स्थान मिळवणारे कथाकार. बाबूराव बागूल यांच्या लेखणीत विलक्षण सामर्थ्य आहे. 'मरण स्वस्त होत आहे', 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'सूड' हे कथासंग्रह लिहून दलितांच्या दारिद्र्याचे, संघर्षाचे, अपमानाचे, लाचारीचे वास्तव चित्रण आपल्या कथेतून रेखाटले. जाणीव, संवेदनशीलता, जीवनचित्रण या बाबतीत बागुलांची कथा पूर्वीच्या दलित कथेपेक्षा वेगळी आहे. त्यांची भाषा आक्रमक, विद्रोही, बंड व नकार यांना पेलणारी व बळ देणारी भाषा बागूल कथेत वापरतात. तर ना.रा. शेंडे यांच्या कथेतील माणसे दुष्ट समाजव्यवस्थेने चिरडून टाकलेली आणि नियतीला शरण गेलेली असतात. केशव मेश्राम दलितांचे दैन्य, दु:ख यांचे भेदक चित्रण करतात. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, अंतर्मुखता, चिंतनशीलता ही केशव मेश्रामांच्या कथेची वैशिष्टये होत.

वामन होवाळ यांनी 'वाटा-आडवाटा', 'वारसदार', 'येळकोट' व 'बेनवाड' हे कथासंग्रह लिहून टगी, बेरकी, इरसाल, छिनाल, भोळी, भाबडी अशा विविध प्रवृत्तीच्या माणसांचे चित्रण आपल्या कथेतून केले. होवाळांचा मूळ पिंडच विनोदी लेखकाचा आहे. त्यांनी ग्रामीण व दलित समस्येवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या कथासंग्रहातील माणसे जिद्दीने जगणारी आहेत. तसेच दारिद्र्याशी झुंज देत जगणारीही माणसे आहेत. त्यांची कथा माणसांना निराश, दु:खी न करता ती पुन्हा नव्या जोमाने उभी करते. तर योगीराज वाघमारे यांच्या कथेतून अजूनही दलितांवर ग्रामीण भागात अत्याचार होतात

हे दिसून येते तर अविनाश डोळस यांच्या कथेत दुभंगलेल्या तरूण मनाचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

दलितांच्या व्यथा, वेदना, दारिद्रय, पिळवणूक मांडणारा एक मोठा वर्ग उदयास आला. अमिताभ, अर्जुन डांगळे, एकनाथ सोनवणे, भीमराव शिरवाळे, राजा ढाले, सुधाकर गायकवाड, माधव कोंडविलकर, दया पवार इ. कथाकारांनी दलितांची दुःखे मांडण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात सांगायचे झाले तर मराठी साहित्याला दलित कथा ही एक देणगीच लाभली आहे.

**विनोदी कथा :-**

मराठी साहित्यात विनोदी कथा लिहिणारे लेखक दुर्मिळच आहेत. १९४५ पूर्वी चि.वि. जोशी, प्र.के. अत्रे यांनी विशेषत: विनोदी कथालेखन केल्याचे दिसते. १९४५ नंतर मात्र विनोदी कथांचे पीक अमाप आल्याचे दिसते. द.मा. मिरासदार यांनी मानवी स्वभावातील विसंगतीवर नेमके बोट ठेवले आहे. 'माझ्या बापाची पेंड' हा कथासंग्रह लिहून ग्रामीण जीवनाचे अनेक किस्से विनोदी शैलीत आपल्या कथांतून रंगविले. शंकर पाटील व रा.रं. बोराडे यांनी आपल्या कथांतून विनोद रंगविले. शंकर पाटील व रा.रं. बोराडे यांनी आपल्या कथेतून प्रसंगनिष्ठ विनोदावर भर दिला आहे. वि.आ. बुवा यांनी बरेच विनोदी लेखन केले. उपहास, उपरोध, विडंबन, शब्दचमत्कृती इ. साधनांचा विनोदाच्या निर्मितीसाठी त्यांनी वापर केला. बाळ सामंत, जयवंत दळवी, रमेश मंत्री, बाळ गाडगीळ, पद्माकर डावरे, व.पु. काळे, सदाशिव आठवले इ. अनेक लेखक विनोदी लेखन करतात.

आत्मपुरूषी लेखनाचाच बरेचजण अवलंब करीत असल्याने विनोदाला कथानिवेदक हा एक चांगला विषय मिळतो. पु.ल. देशपांडे यांनीच या क्षेत्रात काही नावीन्य दाखविले. ग्रामीण जीवनातील विसंगती पण कथेत विनोदाचा विषय बनला. त्यात द.मा. मिरासदारांची कथा ही खऱ्या अर्थाने विनोदी कथा म्हणावी लागेल.[७]

स्त्रियांनीही विनोदी कथालेखन केले आहे. इंद्रायणी  सावकार, शकुंतला फडणीस या विनोदी कथालेखन करताना दिसून येतात.

**भयकथा, अद्‌भुत कथा :-**

भयकथा व अद्‌भुत कथा लिहिणारे लेखक फारच कमी आहेत. 'भयकथा, अद्‌भुतकथा या बाबतीत तर आणखीनच दुर्दशा आहे. जीवनातील भयानक व अद्‌भुत अनुभव परिणामकारक रीतीने रंगविणे आपणाला फारसे साधलेच नाही. आज द.वा. खांबेटे, नारायण धारप, 'मासा आणि इतर कथा' लिहिणारे सदानंद रेगे किंवा 'खेकडा' लिहिणारे रत्नाकर मतकरी अशा काही फार थोड्यांच्या प्रयत्नांवर संतुष्ट राहावे लागते.

आजची मराठी लघुकथा अशा रीतीने जुन्या-नव्याच्या संगमावर उभी आहे.[८]

**विज्ञान कथा :-**

मराठी साहित्यात विज्ञान कथा हा एक नवा वाङ्मय प्रकार उदयास आला आहे. विज्ञान कथा लिहिणारे जयंत नारळीकर, रेखा बैजल, माधुरी शानभाग, निरंजन घाटे, नारायण धारप इ. कथाकार होत. या सर्व कथाकारांनी विज्ञानाचे फायदे व तोटे सांगितले आहेत.तसेच विज्ञानामुळे पुढे काय काय घडू शकते याचे चित्रण कल्पनेने केलेले आहे. विज्ञान कथेने पुराव्यावरती खूप भर दिल्याचे दिसते. विज्ञान कथेमध्ये संशोधनाला खूप महत्त्व दिले जाते. तसेच त्यातील साहसी प्रयोग, रहस्यमयता, भीती, ताणतणाव याचे सुरेख चित्रण विज्ञानकथेत येते. संगणकावरती जयंत नारळीकर यांनी खूप कथा लिहिल्या आहेत. तसेच यांत्रिक मानवाची निर्मिती करून तो माणसांची कितीतरी कामे सोपी करतो याचे चित्रण त्यांच्या कथेत येते. म्हणजेच भविष्यकाळात काय घडेल हे विज्ञानकथा सांगतात.

**अस्तित्ववादी कथा :-**

नवकथेतील अस्तित्ववादी कथा हा एक महत्त्वाचा वाङ्मय प्रकार असून अस्तित्ववादी कथा वास्तवतेवर अधिक भर देते. तसेच मानवी जीवनातील गुंतागुंतीचा वेध अस्तित्त्ववादी कथा घेते. मराठीतील अस्तित्ववादी कथांमध्ये दिलीप चित्रे, विलास

सारंग, श्याम मनोहर आणि एस.डी. इनामदार, कमल देसाई, मेघना फटांगरे, सुकन्या आगाशे इ. कथालेखक कथालेखन करताना दिसतात.

अस्तित्ववादी कथेमध्ये देहधर्मातील सर्वात प्रभावी लैंगिक प्रेरणा आहे असे अस्तित्ववादाला वाटते. लैंगिक प्रेरणाच माणसाचे स्वातंत्र्य सर्वाधिक प्रमाणात खच्ची करते असेही त्याचे मत आहे. साहजिकच लैंगिक प्रेरणेची अनंत व सूक्ष्म रूपे, तिची अनावरता व अनाकलनीयता, तिचा व्यक्तीमनावर होणारा परिणाम व त्यातून व्यक्तीजीवनात निर्माण होणारे अंतर्विरोध व बाह्यविरोध यांना अस्तित्ववादी विचारसरणीत महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. अन्य दर्शनांनी देहाच्या प्रश्नांची उकल न केल्यामुळे तत्वज्ञानाची हजारो वर्षांची परंपरा लाभूनही देहाच्या प्रश्नांनी बेजार झालेली व्यक्ती एकाकी राहिली, असे या दर्शनाला प्रामाणिकपणे वाटते. त्यामुळे देहाचे प्रश्न मांडणे व देहाच्या परिभाषेत बोलणे अस्तित्ववादाला गैर वाटत नाही.[९] अस्तिववादी कथेमध्ये प्रतिमा, प्रतीकांचा संमिश्र आविष्कार पध्दतीचा, विनोदाचा, आभासाचा वापर केलेला दिसतो.

दिलीप चित्र्यांच्या कथेतील पात्रे एकाकीपणे जीवन जगत असतात. चित्र्यांच्या कथा वाचून झाल्यानंतर वाचकाला अंतर्मुख बनवतात. जीवनाच्या कंटाळवाणेपणाची, यांत्रिकतेची जाणीव त्यांची कथा करून देत असते. 'चित्र्यांच्या कथा अस्तित्ववादी आहेत म्हणून केवळ त्या मराठी कथेच्या संदर्भात महत्त्वाच्या ठरत नाहीत. त्या वेगळ्या पध्दतीच्या आणि रूपदृष्टयाही चांगल्या कथा आहेत. म्हणूनच केवळ त्या स्वत:चे स्थान निर्माण करू शकतात.[१०] विलास सारंग यांच्या कथा माणसामाणसातील नात्याचा शोध घेतात. तसेच त्यांच्या कथेमध्ये कृत्रिमता जाणवते. तसेच अस्तित्ववादी कथा लिहिणारे श्याम मनोहर यांच्या कथांमध्ये विविध रंगाची पात्रे असतात. ते त्यांचे ठसठशीत चित्रण करतात. नेहमीच्या जीवनातील प्रसंगावर लेखन करताना दिसतात.

एस.डी. इनामदार हे अस्तित्ववादी कथालेखन करणारे कथाकार. ते सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे वास्तव चित्रण करतात. समाजाची जी आजची परिस्थिती

आहे याचे आणि त्यातच भ्रष्टाचाराचे व्यापकत्व, नीतीमुल्यांचा ऱ्हास या सर्वांचे प्रभावी चित्रण इनामदार करताना दिसतात. मेघना फटांगरे यांच्या कथेत वैचारिकता आणि चिंतनशीलता आढळते. तसेच सुकन्या आगाशे यांच्या कथेत महानगरांमुळे माणूस बदलत चालला आहे. ही महानगरेच माणसाला बदलायला लावतात याचे चित्रण केले आहे. क.दि. सोनटक्के यांची कथा नवकथा व अस्तित्ववादी कथा या दोन्हींच्या सीमारेषेवर वावरताना दिसते.

'कोठल्याही प्रश्नांवर लेखक एक प्रकारचे नैतिक भान निर्माण करू शकतो हे भान दुहेरी पातळीवर व्यक्त होत असते. एक निरोगी, विधायक, जीवनसन्मुख दृष्टीतून, तर दुसरीकडे विकृत, पराभूत, जीवन-विन्मुख दृष्टीतून. हा दुसरा मार्ग पत्करणारा लेखकही एका अर्थाने स्वत:ची प्रखर नैतिक संवेदनक्षमता व्यक्त करीत असतो. अस्तित्ववादी जीवन प्रणालीतील नैतिक संभ्रमावस्था ही देखील अशाच प्रकारची असू शकते. या लघुकथेनेच स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याला आधुनिकतेची दृष्टी दिली आहे.'[११]

**समारोप :-**

मराठी कथेचा एकूण आढावा घेतला तर असे जाणवते की, मराठीतील सर्वात जुना आणि आदय कथासंग्रह म्हणून आपण म्हाइंभटाच्या लीळारित्राकडेच पाहतो. त्यातील एक एक लीळा म्हणजे चक्रधर स्वामींच्या जीवनातील कथारूप प्रसंगच आहेत. नंतरच्या कालखंडामध्ये भाषांतरीत वा रूपांतरीत स्वरूपामध्ये कथावाङ्मय निर्माण झाले. 'करमणूक' काळात घटनाप्रधान व पाल्हाळिक स्वरूपात असणारी कथा 'मनोरंजन' काळात रेखीव, कलात्मक झाली. 'यशवंत-किर्लोस्कर' कालखंडातल्या कथेने आपले स्वतंत्र तंत्र बनविले. कथेच्या आशयाचा विस्तार वाढविला. 'सत्यकथा-अभिरूची' कालखंडामध्ये नवकथाकारांनी आपल्या अनुभव, मनन, चिंतनातून कथेला समृध्द केले. १९६० नंतर मात्र कथेच्या क्षेत्रात बराच बदल झालेला दिसतो. स्त्रीकथा, दलितकथा, अस्तित्वावादी कथा, ग्रामीण कथा, प्रादेशिक कथा, विज्ञानकथा इ. कथेचे

प्रकार उदयास आलेले दिसतात. नवकथेने कथेच्या क्षेत्रात बदल केल्याचे दिसतात. नवकथेतील लेखकांनी जे पाहिले, अनुभवले, भोगले तेच आपल्या कथांमधून मांडल्याचे दिसते. थोडक्यात नवकथेमुळे मराठी साहित्यात मोलाची भर पडल्याची दिसते.

**संदर्भ :-**


१. 'मराठी कथा : उगम आणि विकास', इंदुमती शेवडे, मुंबई १९७३, पृ. ३०.

२. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. ९८.

३. 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, इ.स. १९४७ ते २०००' प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ. १२०.

४. 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, इ.स. १९४७ ते २०००' प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ. १२६.

५. 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, आवृत्ती पहिली, जुलै २००२, पृ. ८१.

६. 'दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया', प्रा. गो.म. कुलकर्णी, पुणे, प्रथमावृत्ती १९८६, पृ. १८२.

७. 'अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा', प्रदक्षिणा खंड पहिला, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, नववी आवृत्ती, १९९७, पृ. १९६.

८. 'अर्वाचीन मराठी साहित्याचा चिकित्सक आढावा', संपा. म.न. अदवंत, प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, नववी आवृत्ती, १९९७, पृ. १९६-१९७.

९. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २३२.

१०. 'मराठी कथेची स्थितीगती', अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २४२.

११. 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा, इ.स. १९४७ ते २०००' प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. म.ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ. १५०.

***